# अथातो धर्मजिज्ञासा

## सामवेद

### हिंदू तत्वज्ञान व अध्यात्म



कुमारी शक्तिलीला (निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अथातो धर्म- जिज्ञासा-३

(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)

निकिता राजेश पाटील

**एका विद्यार्थिनीने** लिहीलेलं हे पुस्तक.

तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या विचारांच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं.

वाट पहातो आहोत. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.

निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ,
वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

# अथातो धर्म- जिज्ञासा- ३

## (हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)

निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eternity,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : १३ जुलै २०२२ (गुरुपौर्णिमा शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

***अथातो धर्मजिज्ञासा भाग ३***

***-सामवेद***

***(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)***

-निकिता राजेश पाटील

**परिचय :** नाव:-निकिता राजेश पाटील.



वांगणीत वास्तव्य.

"कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

**वाड्मयीन परिचय-**

१. चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२. टिळक नगर सांस्कृतिक महोत्सवात 'द्रौपदीचे स्वगत' या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण. (वेशभूषा, प्रयोग लेखन, फार्सलेखन यांचा मेळ )

३. विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात (सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त 'द्रौपदीचे आत्मकथन हा ललित लेख, 'मनाचे प्रदुषण' ही कविता व 'बायको नावाचं अजीब रसायन' ही विनोदी कथा प्रकाशित.

४. डोंबिवलीतील आणि बदलापुरात काव्य संमेलनात सक्रिय सहभाग.

६. अनेक निबंध, वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक.

७. संस्कृत भाषेतील 'अमृत गौरव' पुरस्कार,

८. अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या लेखाचे लेखन,

९. मानव विद्या विभागात वाचन संस्कृती' डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व या विषयांवर संशोधन.

१०. 'फार फार वर्षांपूर्वी' व 'संघर्ष' ,' सीमान्त' या तीन पुस्तकांवर केलेली समीक्षा. त्यातील संघर्ष' या समीक्षाला पुरस्कार प्राप्त.

११. मनोजन' या मासिकात मानसिक आरोग्याचा मूलमंत्र या विषयावर लेख. सृजन या वार्षिकात कविता आणि लेख प्रकाशित.

१२. चित्रकलेत गोल्ड मेडल.

१३. ई साहित्यावर एक रहस्य कथासंग्रह, दोन कादंबऱ्या (द्रौपदी वर आधारित), अद्भुत कथासंग्रह, विडंबन काव्य संग्रह, चार आध्यात्मिक ग्रंथ, एक विज्ञान लेखमाला, 'अधातो धर्म जिज्ञासा ' हिंदू तत्वज्ञान व

अध्यात्म’ या विषयावर आधारित दोन भाग प्रकाशित, अशी एकूण बारा पुस्तके प्रकाशित झाली.

१५. अथातो धर्म जिज्ञासा’ या हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्म विषयावर प्रबंध.

१६. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या संकल्पना सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत. त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- एसवाय बीए,

माझं हे प्रबंध रुपी पुस्तक आवडल्यास shaktileelanikita@gmail.com या ईमेलवर अभिप्राय देण्यासाठी संपर्क साधू शकता. माझी इतरही पुस्तके डाऊनलोड करून तुम्ही वाचण्याचा मनमुराद आनंद घेऊ शकता.

फोन नंबर:- ८६८९९५४८०६👸 👰 👸

# अर्पणपत्रिका

माझ्या प्रेमळ, स्नेहलता, मनस्विनी, मेधावी,
महाभारतातील सारमौक्तिकांचे ज्ञान प्रदान
करणाऱ्या, अध्यात्म आणि गृहस्थाश्रम यांना
एकाच गाडीची चक्रे बनवणाऱ्या, विश्वातील
रहस्ये उलगडून देणाऱ्या, माझ्या मातेला व
गुरुला हा संशोधन प्रबंध समर्पित.

तुझी पुत्री आणि शिष्या,

कुमारी शक्तिलीला..

# उपोद्घात



सामवेद हा संगीताचा वेद, फक्त संगीताचाच नव्हे, तर धर्म, नीती, अध्यात्म, विज्ञान, यज्ञ, कर्मकांड, पोषकता व जीवनदर्शन आदिंचे विवेचन करणारा हा वेद आहे.

ह्या वेदामध्येसुध्दा वसिष्ठ मैत्रावारूणि, प्रयोग भार्गव, नारद, वार्षागिर या महान ऋषिंनीच नव्हे, तर गोधा, सार्पराज्ञी, शिखंडिनी- काश्यपी, सिकता निवावरी आदि विदुषी ऋषिकांनीही मंत्र व सूक्त रचले आहेत.

यात काहीच शंका नाही, हा वेद अन्य तिन्ही वेदांचे सार आहे. ऋग्वेद, यजुर्वेद व अथर्ववेदाचे ऋचा, मंत्र आणि यजुष सामवेदामध्ये आढळतात. याखेरीज जीवनाच्या सोळा संस्कारांमधील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणाऱ्या

विवाहसंस्कारामध्ये पाणिग्रहण करताना म्हटल्या जाणाऱ्या आणि सूर्या या ऋषिकेने रचलेल्या ऋग्वेदातील विवाह सूक्ताच्या एक – दोन ऋचाही या वेदात आढळतात. या सूक्ताचा मी 'अथातो धर्मजिज्ञासा' या पुस्तकाच्या प्रथम भागात उल्लेख केला नव्हता, मात्र सोळा संस्कारांच्या भागात ह्या सूक्ताचा निश्चित उल्लेख करेन.

माझ्या आताच्या तृतीय भागाविषयी बोलायचे झाल्यास, हा सामवेद असल्याकारणाने, संगीत- गीताचा वेद असल्याकारणाने मी यथारुप, यथाबुद्धी प्रत्येक सूक्त, मंत्राचे राग, रागिणी व रागचक्राचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

यापुढील भाग अथर्ववेदाविषयी लिहिण्याचा मानस आहे!

अथर्ववेदाला तंत्र, मंत्र अथवा जादूटोणा आदिंचा विवेचक म्हटले जाते, ते सत्य नसून अथर्ववेद धर्म- अध्यात्म, नीतिमत्ता, राज्यकारभार, तत्वज्ञान- विज्ञान, व्याधी चिकित्सा व उपचार, भूगोल- खगोलशास्त्र अशा सर्व विषयांनी कसा परिपूर्ण आहे, हाच माझा प्रयास राहील!

# अथातो धर्म- जिज्ञासा- ३

# सामवेद

# हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म

(संशोधनपर प्रबंध)

# सामवेद

सामवेद या शब्दाचा अर्थ असा आहे की ज्या वेदामध्ये मंत्रांचे गायन करण्याची पद्धती समाहित आहे, असा सामवेद. हा वेद गीत संगीत प्रधान असून या वेदातील मंत्रांचे गायन म्हणजे साम-गान होय. सामवेदाचा विस्तार अन्य तिन्ही वेदांपेक्षा लहान असला तरी, हा वेद अन्य तिन्ही वेदांचे सार आहे. कारण सामवेद यामध्ये एकूण १८७५ मंत्र आहेत. मात्र त्यापैकी १५०४ मंत्र ऋग्वेदातील आहेत, तर यजुर्वेदातील व अथर्ववेदातील मंत्र १७ असून साममंत्र एकूण ९९ आहेत. सामवेद संहितेचे दोन भाग आहेत- आर्चिक व गान. आर्चिक भागाचे तीन भाग पडतात- पूर्वआर्चिक, महानाम्न, उत्तरार्चिक. सामगानाचे प्रस्ताव, उद्गीथ, प्रतीहार, उद्गव/ उपद्रव आणि निर्वाण हे पाच भाग आहेत.

उद्गीथ म्हणजे साक्षात ओमकार प्रणव असल्याचे छांदोग्य उपनिषदात म्हटले आहे.

सामवेदाची आग्नेय, ऐंद्र, पावमान आणि आरण्य अशी एकूण चार पर्वे आहेत. सामवेदाच्या एकूणच सहस्त्र शाखा असल्याचे म्हटले जाते. त्यातील तीन आचार्यांच्या शाखा अत्यंत महत्त्वाच्या आहेत – कौमुथी/ कौमुरथी, राणायनीय व जैमिनीय.

सामवेद हा तिन्ही वेदांचे सार आहे म्हणूनच भगवद्गीतेत कृष्ण अर्जुनाला कथित करतो की "**वेदानाम् सामवेदोस्मि** !!" म्हणजेच मी चारही वेदांमध्ये सामवेद आहे. याखेरीज महाभारताच्या अनुशासन पर्वामध्ये सामवेदाची महती कथित केली आहे, "**सामवेदश्च वेदानाम् यजुषां शतरूद्रीयम्** ||"

याशिवाय अग्निपुराणामध्ये असे म्हटले आहे की सामवेदाच्या मंत्रांचा जप केल्यास रोग व्याधींपासून मुक्तता होते व इच्छापूर्तीही होते. म्हणूनच म्हटले जाते, गेयनामध्ये शक्ती असते.

याखेरीज छांदोग्य उपनिषदांमध्ये सामवेदाला उद्गीथांचा रस म्हटले जाते. अथर्ववेदाच्या चौदाव्या कांडामध्ये, ऐतरेय ब्राह्मण्यातील आठव्या अध्यायाच्या सत्ताविसाव्या श्लोकामध्ये व बृहदारण्यकोपनिषदाच्या सहाव्या कांडामध्ये चौथ्या

अध्यायाच्या सत्ताविसाव्या श्लोकामध्ये ऋग्वेदातील ऋचांना व सामवेदाच्या मंत्रांना पती व पत्नीच्या रूपात दर्शविले आहे,

“ **सामहमस्मि ऋक् त्वम् !!**”

या श्लोकाचा अर्थ असा आहे की हे प्रिये,पत्नी ! मी जर सामवेदातील मंत्र आहे, तर तू ऋग्वेदातील ऋचा आहेस.

याशिवाय छांदोग्य उपनिषदांमध्ये असेही म्हटले आहे की

**इयमेव पृथ्वी ऋक् इयमेवर्गाग्नि साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढ् साम||**

याचा अर्थ असा आहे की पृथ्वी ही ऋक् म्हणजे ऋचा आहे आणि अग्नी हा साम आहे. म्हणून ऋकमध्ये प्रतिष्ठित असणाऱ्या सामाचे गायन केले जाते.

असे अनेक श्लोक छांदोग्य उपनिषदामध्ये आहेत,

जसे की,

१) **द्यौरेका ऋकादित्य: साम||**

म्हणजेच द्यौ म्हणजे स्वर्ग ही ऋक् आहे, तर आदित्य हा साम.

२) **अन्तरिक्षमेवर्ग ऋक् वायु: सामेत्यादि पूर्ववत्॥**

याचाच अर्थ अंतरीक्ष ही ऋक्, तर वायू हा साम आहे.

३) **अथाध्यात्मं वागेवकर्प्राण: साम:॥**

म्हणजे अध्यात्मामध्ये वाणी ही ऋक् आहे तर, प्राण हा साम आहे.

४) **श्रोत्रमेवङर्मन: साम:॥**

याचा अर्थ असा आहे की श्रोत्र म्हणजे वेदज्ञान, विद्वत्ता, बुद्धिमत्ता अथवा मेधा ही ऋक् आहे व मन हे साम आहे.

याखेरीज ऋक्, साम व यजुष मधील परस्पर संबंध दर्शवण्यासाठी एक श्लोक छांदोग्य उपनिषदात व शांकरभाष्यात आढळतो,

“ **उक्थसाहचर्याद्वा स्तोत्र साम ऋक् शस्त्रमुक्थादन्यम् ।**

**यजु:स्वाहास्वधापडादि सर्वमेव वाग्यजुस्तत्स: ॥”**

याचा अर्थ असा आहे की उक्थ या यज्ञाचे साहचर्य करणारे स्तोत्र हे साम आहे, उक्थ या यज्ञाचे संरक्षक व तारक शस्त्र हे ऋक् आहे. हविष्य व आहुती ग्रहण करणारी स्वाहा,

स्वधा हे सर्व काही, इतकेच नव्हे, तर या यज्ञाची वाणी ही यजुष् आहे.

ज्याप्रमाणे ऋग्वेदातील मंत्र अथवा श्लोकांना ऋचा म्हटले जाते, यजुर्वेदातील मंत्रांना अथवा श्लोकांना युजष् म्हटले जाते, त्याचप्रकारे सामवेदातील मंत्रांना अथवा श्लोकांना सामानि अथवा साममंत्र असे म्हटले जाते.

ऋग्वेदातही याच सामानि अथवा साममंत्राचा उल्लेख अथवा वर्णन २१ वेळा आढळते. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडळातील ४४ व्या सूक्तातील चौदाव्या ऋचेत, पहिल्या मंडलाच्या ६२ व्या सूक्तातील दुसऱ्या ऋचेत, दुसऱ्या मंडलाच्या २३ सूक्तातील सतराव्या ऋचेत व नवव्या मंडलातील ९७ व्या सूक्तातील 22व्या ऋचेमध्ये सामानि अथवा साममंत्रांविषयी उल्लेख आढळतो.

याखेरीज असेही म्हटले जाते, समग्र स्वर, ताल, लय छंद, गती, स्वरचिकित्सा, राग, रागिनी, नृत्यमुद्रा, न्यास व भाव आदींचा जनक सामवेदच आहे.

सामवेदामध्ये कथन केलेली सामवेदाच्या गायनाच्या पद्धतीमध्ये आधुनिक हिंदुस्थानी व कर्नाटकी संगीताप्रमाणे

सप्तसुरांचा क्रम आढळतो, मात्र सुप्तावस्थेत. याचाच अर्थ, आधुनिक हिंदुस्थानी व कर्नाटकी संगीताचा उगम सामवेदात आढळतो.

जसे :-

१) **षडज् :- सा**

२) **ऋषभ :- रे**

३) **गांधार :- गा**

४) **मध्यम :- म**

५) **पंचम :- प**

६) **धैवत :- ध**

७) **निषाद :- नि.**

# अग्निसूक्त

अग्निसूक्त हे सामवेदातील आर्चिक संहितेतील पूर्वार्चिक भागातील आग्नेय पर्वातील आहे. अग्नि सूक्त हे आग्नेय पर्वातील बाराव्या खंडातील आहे. या सूक्तामध्ये एकूण आठ साममंत्र आहेत. या सूक्ताची अग्नि असून छंद उष्णिक् आहे. या सूक्ताचे ऋषिका व ऋषि- ऋषिका विश्वमना वैयश्व, सौभरि काण्व व प्रयोग भार्गव आहेत.

मजजवळ याचे सामगान कसे करावे याबाबतची प्रत उपलब्ध नाही, तरीही मी यथाबुद्धी त्याचे स्पष्टीकरण करेन.

याखेरीज याखेरीज या सूक्ताचा राग ८० भव्य अशी बहुतांशी वेद अथवा श्री असावा कारण हे राग काहीशे जटिल आहेत.

या सूक्ताचे रागचक्र अग्निचक्र आहे. अग्निचक्रामध्ये भैरव, वेद, श्री, दिपक असे सहा राग असतात.

या सूक्ताची रागिनी भैरवी असावी. कारण भैरवीचे तेज या सूक्तात झळकते. या सूक्ताचे गायन अधिक सुलभ रीतीने करता

येते. कारण या सूक्ताच्या प्रथम सात चरणांमध्ये अथवा साममंत्रांमध्ये यमक आहे, म्हणजेच शेवटच्या अक्षरांच्या उच्चारणामध्ये अथवा ध्वनीमध्ये साम्य आहे. याशिवाय हे सूक्त अल्पाक्षरी आहे. त्याकारणे या सूक्ताची गेयता सहजसुलभ होते. या सूक्ताची लय यमकामुळे स्थिर आणि ओघवती झालेली आहे.

ह्या सूक्तामध्ये अग्निच्या सामर्थ्याची स्तुती केली आहे. अग्निदेवाला देवतांचे मुख अथवा मस्तक म्हटले आहे. कारण अग्निमुळे विश्वामध्ये, ब्रम्हांडामध्ये जीवन, सृजन, गति, ऊर्जा, शक्ती आणि तेजाचा विस्तार होतो.

हे सूक्त पुढीलप्रमाणे :-

**प्र मंहिष्ठाय गायत ऋताने बृहते शुक्रशोचिषे|**
**उपस्तुतसो अग्नये||**

**प्र सो अग्ने तवोतिभिः सुवीराभिः स्तरति वाजकर्मभिः|**
**यस्य सख्यमाविध||**

**तं मूर्धया स्वर्णरं देवासो देवमरतिं दधन्विरे|**
**देवत्रा हव्यमूहिषे||**

मा नो हृणीथा अतिथीं वसुरग्निः पुरूप्रशस्त एवः|
यः सुहोता स्वध्वरः||

भद्रो नो अग्निराहुतो भद्रा रातिः सुभग भद्रो अध्वरः|
भद्राषुप्रशस्तयः||

यजिष्ठं त्वा ववृमहे देवं देवत्रा होतारममर्यम्|
अस्य यज्ञस्य सुक्रतुम्||

तदग्ने द्युम्नमा भर यत्सासाहा सदने कं चिदत्रिणम्|
मन्यु जनस्य दूढ्यम्||

यद्वा उ विश्यति शितः सुप्रीतो मनुषो विशे|
विश्वेदग्निः प्रतिरक्षांसि सेधति||

यातील प्रथम साममंत्राचा असा अर्थ आहे की हे स्तोतागणहो म्हणजे स्तुति- स्तवनकारहो ! आपण सर्वांनी श्रेष्ठ स्तोत्रांद्वारे अग्निदेव आणि स्वाहादेवीचे स्तवन करावे. कारण हे उभयंता महान सत्य आहेत, धर्म- नीतीचे पालक आहेत, यज्ञाचे जनक आहेत, प्रज्वलित तेजाने युक्त आहेत.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे साधकहो! हे योगीजनहो आणि सिध्दगणहो! आपण सर्व आपल्या श्रेष्ठ वाणी, साधना, कर्म, धर्म, आचरण व विचारांद्वारे परमप्रकृती व परमात्म्याची स्तुती करावी, स्तवन करावे, कारण हे उभयंताच सत्य, धर्म, नीती, यज्ञ, कर्म व तेज आहेत. हे उभयंताच सृष्टीचे पालनकर्ता आहेत.

दुसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे अग्निदेवा व स्वाहादेवी ! आपण ज्यांचे मित्र, सखा, बंधु, भ्राता होऊन सहाय्य करतात, ते स्तोतागण आपणांपासून सर्वश्रेष्ठ अपत्य, कन्या व पुत्र, अन्न, बल, शक्ती, ऊर्जा, तेज व मेधा प्राप्त करतात व ते समृद्ध होतात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे परमात्मा व परमप्रकृती ! आपण सर्वांचे माता पिता असलात, तरी आपण भक्तांचे, साधकांचे,

सिध्दगणांचे व योगीजनांचे मित्र, सखा बंधु आणि भ्राता आहात, वारंवार सहायता करणारे आहात. सर्व भक्त, साधक, सिद्ध गण आणि योगीजन तुमच्याचकारणे उत्तम व दिव्य अनुभूती, ऊर्जा, शक्ती, तेज, धैर्य आणि संयम प्राप्त करतात. त्यांची साधना व भक्ती सुकर होत असते.

तिसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे स्तोतागणहो! स्वर्गातील प्रत्येक देवतेकडे हविष्य, आहुती, धन, धान्य, बली व समिधा आपल्या पत्नी स्वाहेद्वारे पोचविणाऱ्या व पुरोहित, अर्ध्वर्यू, होतारांना आपल्या द्वितीय पत्नी दक्षिणेद्वारे धनधान्य असे मूल्य प्रदान करणाऱ्या अग्निदेवाची स्तुती करा. याजकगण म्हणजे यजमान- होत्री व पुरोहित- होतार या अग्निदेवाचे स्तवन करतात व अग्निदेवांद्वारे देवतांना हवनीय द्रव्य प्रदान करतात.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे साधकहो, योगीजनहो! सिध्दगणहो! प्रत्येक साधकाला अनुभव, अनुभूती, तेज, प्रज्ञा, स्थितप्रज्ञता आदि सर्व काही कुंडलिनीद्वारे प्रदान करणाऱ्या आणि गुरुजन, योगीजनांना श्री गायत्री देवीद्वारे मेधा प्रदान करणाऱ्या परमप्रकृती आणि परमात्म्याची स्तुती करा. याखेरीज

सामान्य भक्तही व त्यांचे गुरूही या उभय महान तत्वांचे स्तवन करतात आणि परमात्मा व परमप्रकृतीला प्रेम, भक्ती, समर्पण, धर्म, सत्य, तन, मन आणि आत्मा अर्पित करतात, म्हणजे या साममंत्रामध्ये समर्पणाला अत्यधिक महत्त्व दिले आहे.

यातील चौथ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की आमच्या होत्रकुंडामध्ये, यज्ञकुंडामध्ये, दीपकांमध्ये समईमध्ये, दीपदंडामध्ये आणि विस्तवांमध्ये अतिथीरूपाने येणाऱ्या अग्निदेव व स्वाहादेवीला कृपया यज्ञ, मंत्र, हविष्य, यजुष, समिधा व यजमान- होतारांपासून दूर नेऊ नका. अग्नि व स्वाहादेवी देवतांकडे भक्त अथवा याजकाचे हविष्य पोहचविणारे, धनदाता व अनेक विदुषी- विद्वानांद्वारे स्तुत्य व पूजनीय आहेत. या साममंत्रामध्ये हिंदूंना आपल्या धर्म, संस्कृतीपासून विन्मुख न होण्याचे आवाहन व सूचितही केले आहे.

अध्यात्मदृष्टीने पाहता, आम्हां साधकांच्या तनामध्ये, मनामध्ये, कृतींमध्ये, विचारांमध्ये व साधनेमध्ये अतिथीरूपाने येऊन वास करणाऱ्या परमप्रकृती आणि विश्व, ब्रम्हांड, मानव, पशु, पक्षी व देवतांपासूनही विभक्त करणे शक्य नाही, कारण

सर्वजण त्याचेच अंश आहेत. हे परमप्रकृती आणि परमात्मा आपल्या सर्वांचे समर्पण व भक्ती ग्रहण करणारे परमानंददाता व अनेक सिध्द, योगीजनांद्वारे स्तुत्य व पूजनीय आहेत.

यातील पाचव्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हविंकारणे संतुष्ट झालेल्या हे स्वाहादेवी आणि अग्निदेवा! आपण आमच्याकरिता सदैव मंगलकारक ठरावेत, कारण आपण उभयंताचे रूप दहन, आग्नेयास्त्र, वडवानल, दावानल आदि स्वरूपांमध्ये भयावह व ज्वलनशील आहे, म्हणून आपण आम्हांला अग्नीपासून संरक्षण होण्याचा आशिष द्यावा. हे ऐश्वर्यशाली देवतांनो! आम्हाला कल्याणकारी धन प्राप्त व्हावे, जे पुण्याईने, सत्य, धर्म व नीतीच्या मार्गाने साध्य झालेले असेल, आपल्या ज्या-ज्या स्तुती आहेत, त्या-त्या गाऊन आमचे शुभ, इष्ट, मंगलमय कल्याण होवो.

अध्यात्मदृष्टीने पाहतां, साधना, तप, जप, ध्यान, कर्मकांड, यज्ञ आदिंकारणे प्रसन्न झालेल्या प्रकृती कुंडलिनी व परमपुरुष आत्मा! तुम्ही उभयंता सदोदित आम्हाला विशुद्ध स्वरूपात स्थिर ठेवावे. कारण हे महामाये व माया स्वरूपा, तुम्ही उभयंता

आमची विकार, वासना, विपदा, दुविधा, संघर्ष, दु:ख आदि प्रकारे परीक्षा घेत असता, अशा विपदेच्या काळात आम्हाला स्थैर्य, धैर्य, विवेक, मेधा, संयम व विचारीपणा आदि प्राप्त होण्याचा आशिष द्यावा. हे परम प्रकृती व परमपुरुषा! आम्हांला कल्याणकारी, विशुद्ध आनंद आणि अनुभूती प्राप्त व्हाव्यात, ज्या विकार, वासना, दुविधा व कुविचारांनी मलिन झालेल्या नसतील, आपली साधना करून आम्हाला आमचे निजधाम व मोक्ष प्राप्त व्हावा.

यातील सहाव्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे देवाधिदेवा अग्नि व देवतांची राज्ञी स्वाहादेवी! आपण उभयंता श्रेष्ठ याज्ञिक आहात. याज्ञिक म्हणजे याजकगण, पुरोहित, अर्ध्वयू, यजमान व होतार सर्वकाही. आपणच कर्मयज्ञ, राजसूय यज्ञ, होत्र, जीवनयज्ञ, संघर्ष यज्ञ व क्रांतियज्ञाला उत्तम प्रकारे सफल व संपन्न करणारे आहात, आम्ही आपली स्तुती करत आहोत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे आदिशक्ती व आदिपुरुषा! आपण उभयंता अत्यंत श्रेष्ठ योगीसुध्दा आहात, आपणच आमच्या हिंदू

जागृती व हिंदू राष्ट्र निर्माणाच्या यज्ञात साहाय्य करावे, आम्हीही त्यांची स्तुती करत आहोत.

यातील सातव्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे स्वाहादेवी व अग्निदेवा! आपण आम्हाला असे प्रखर तेज, सामर्थ्य, शक्ति, बुद्धी, विवेक, आणि मेधा प्रदान करावी, जेणेकरून यज्ञामध्ये व्यत्यय आणणाऱ्या दुष्ट शक्तींना, व्यक्तींना नियंत्रित करता यावे. याखेरीजही दुर्बुध्दीयुक्त व्यक्तीच्या यज्ञाप्रति असलेल्या क्रोध, तिरस्कारही दूर करता येईल हीच आमची प्रार्थना आहे.

अध्यात्म दृष्टीने व हिंदुत्व दृष्टीने पाहिल्यास, हे परमात्मा व परमप्रकृती! आम्हां सर्व साधकांना असे प्रखर तेज, सामर्थ्य, शक्ती, बुद्धी प्रदान करावी, जेणेकरून आमच्या साधनेत जगतकल्याण, विश्वोध्दार व हिंदुत्व रक्षणाच्या कार्यरुपी यज्ञामध्ये व्यत्यय आणणाऱ्या दुष्ट शक्तींना, अशा प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तींना- जे हिंदुत्व विरोधी व अध्यात्म विरोधी आहेत, अशांना नियंत्रित करता यावे व त्यांना पाठ पढविता यावा. याखेरीज काही

दुर्बुध्दीयुक्त लोकांचा हिंदू धर्म, हिंदुत्व, अध्यात्म व साधनेप्रति असलेला निष्कारण तिरस्कार व क्रोध दूर करण्याचे सामर्थ्य ही दे.

यातील आठव्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे अग्निदेवा व स्वाहादेवी! आपण उभयंता यजमानांचे रक्षक आहात, जे हविष्यान्नाकारणे प्रदीप्त-तेजस्वी  झालेले आहेत. आपण उभयंता याजकांवर प्रसन्न होऊन याजकांच्या समीप निवास करता व प्रतिष्ठित होता आणि सर्व दृष्ट-दुराचारी व्यक्ती व आसुरी शक्तींचा विनाश करताहात.

अध्यात्म दृष्टीने व हिंदुत्व दृष्टीने पाहता, हे परमात्मा व परमप्रकृती! आपण उभयंता साधक, योगी, सिध्द आणि सज्जनांचे रक्षक आहात, जे अध्यात्म व हिंदुत्वाकारणे तेजस्वी व प्रदीप्त झालेले आहेत. आपण उभयंता आमच्यावर प्रसन्न व्हावेत, आमच्या समीप निवास करावा आणि सर्व दृष्ट-दुराचारी व्यक्ती व आसुरी शक्तींचा विनाश करावा. हा शेवटचा मंत्र आहे, अग्निसूक्तात

# आरण्यगान सेतुसाम

हा सामवेदाचाच अंश आहे, जो सेतुसामाच्या नावे प्रसिद्ध आहे. हा सेतुसाम नामक साममंत्राचा जो समूह आहे, ज्यामध्ये एकाच ऋचेतील अथवा साममंत्रातील चार चार पदांना विभक्त करुन त्यातील संगीत अनुरुप रागांच्या अंशांना दाखविले जाते. ह्या रागांचे अंश अंकरुपामध्ये दर्शविले जाते. यांनाच स्तोभ म्हणतात. स्तोभ हे संगीत व गायन विधीचे ज्ञान देणारे आहेत. याखेरीज आधुनिक काळाच्या शास्त्रीय रागांमध्ये एकच पद वारंवार उच्चारण्याची पध्दती आहे, त्या पध्दतीचा उगम सामवेदातूनच झाला आहे.

या सुतसोमामध्ये पाच ऋचा किमान आहेत, परंतु त्यातील संगीत स्पष्टीकरण आधुनिक संगीतालाही लाजवेल.

याशिवाय या सुतसोमाचे हे वैशिष्ट्य आहे की स्तोभ या स्पष्टीकरणाच्या प्रकरणात मोठ्या अक्षरांवर छोटी अक्षरे तसेच संख्यावाचक अंकगायनाविधी लिहिले जातात. हे स्पष्टीकरण

अंकगायनाविषयी स्वराचा अवबोध करण्यासाठी असते. अंकाचा काही अर्थ नसतो, तरीही त्याचा उपयोग अर्थबोध करण्यासाठी केला जातो. याखेरीज या स्पष्टीकरणांमध्ये एकाच ऋचेच्या चार पदांच्या मध्ये अथवा पदांनंतर दुसराच पाठ दिला जातो. हा संगीतविधी केवळ अंकगायन करुन समजत नाही तर त्याकरिता सामगायन करणाऱ्या गुरुंचीही आवश्यकता असते.

हे सेतुसोम पुढीलप्रमाणे :-

२१ *१ रर ३* *२ १*

*हाऊ ||३|| सेतु स्तर ||३|| दुस्त || रान ||३||*

*१ र् २ र् १+र् २* *२र*

*दानेवादानम् ||३||. हाऊ ||३||*

*२. र १. २. १ र् २ २ र् १ रर*

*अहमस्मिप्रथमजाऋता २३ स्या ३४५ ||हाऊ||३|| सेतु*

*२. २ १*

स्तर ॥३॥ दुस्त ॥ रान् ॥३॥

१ र् २ र्. १ र् २.   १ र् २ र् १.     २

अक्रोधेन क्रोधं ॥२॥ अक्रोधेन क्रोधं ॥ ॥ हाऊ ॥

२ र् र् र र्  १        २  १११  २ र

पूर्व देवेभ्यो  अमृतस्यना २३ मा ३४५ ॥ हाऊ ॥ ३ ॥

१ रर  २  २ १.           २ १ १ र् २ र

सेतु स्तर३ दुस्त ॥ रान् ॥ ३ ॥ श्रध्द्याश्रध्दां ॥ ३ ॥

२ र्      २ र्  र् र्.  र् १.  २. १ १ १

हाऊ ॥ ३ ॥  योमाददातिस इदेवमा २३ वा ३४५ त् ॥

२ र्     १ र् र   २      २ १

हाऊ ॥ ३ ॥ सेतु    स्तर ॥ ३ ॥ दुस्त ॥ रान् ॥३॥

२ १ र् र् २.        २ र्        २.        १

सत्येनानृंत ॥ ३ ॥.    हाऊ ॥ ३ ॥ अहमन्नमदंतमा

१११

२३ इमी ३४५ ॥

२        २ र् १ र्.        २ र १ २ १

हाऊ ३ वा ॥ एषा    गतिः ॥ ३ ॥ एतद् मृत ॥ ३ ॥

१ २        १ र् २.        र् र्

स्वर्गच्छ ॥ ३ ॥ ज्योतिर्गच्छ ॥ ३ ॥ सेतु

२ र् र् र   २ १.   १ १ १ १

स्तीर्त्वाचतुरा        २ ३ ४ ५ ॥

प्रस्तुत सेतुसामाचा असा अर्थ आहे की चार दुस्तर दऱ्यांना पार करा. ह्या चार दऱ्या लोभ, क्रोध, अश्रध्दा, असत्य आहेत. दानाने लोभाला परास्त करा, अश्रध्देला श्रध्देने परास्त करा, सत्याने असत्याला परास्त करा. हाच एक मार्ग आहे सन्मार्ग आहे, (जो) आहे तोच अमृतत्व आहे. स्वर्गाला, परमोच्च लोकाला, हिंदुत्वाला व मोक्षाला प्राप्त करा. ज्योतीला व परमात्म्याला प्राप्त करा. या चारही दऱ्यांना पार करण्याचा आदेशांच्या मध्ये मध्ये ऋचेचे चार पद दिले गेले आहेत. यापुढील ऋचेमध्ये अथवा साममंत्रांमध्ये साधक, योगी, सिद्ध अथवा धर्माचारी म्हणतो, “मी ऋतापासून सर्वात आधी उत्पन्न होणारा आहे. मी देवतांच्या आधीही होतो, मीच अमृत आहे, मीच परब्रम्ह आहे, जो मला भक्ति प्रदान करतो, तो एका अर्थाने मला शक्ती प्रदान करत आहे. तो माझ्या श्रध्दा, शक्ती, भक्ती, निष्ठा, समर्पण व निर्मितीचे रक्षणाकरिता करत आहे. मी अन्न आहे आणि मीच अन्नादाला भक्षण करणारा आहे. अन्नादाला म्हणजे अन्नग्रहण करणारा अन्न- भक्षण करणारा, मीच अन्नादाला ग्रहण करणाराही आहे.

ही ऋचा मूलतः अध्यात्मिक आहे. त्याकारणे मी येथेही अध्यात्म दृष्टीने पाहता असे लिहिणार नाही. साधक ज्याक्षणी परमात्म्याशी एकरुप झाला, त्याक्षणीच असे शब्द उच्चारू लागतो. या ऋचेचा अर्थ समजून घेण्यापूर्वी आपण ऋत, देव, अन्न-अन्नाद या तीन तत्त्वांना समजून घ्यावे लागेल. केंद्ररहित परब्रम्हालाच-विश्वनियंत्यालाच ऋत म्हटले जाते. आणि ऋतालाच सत्य अथवा नृत मानले जाते. म्हणून ऋत व नृत ही परमनामे युग्मानेच मुखी ग्रहण केली जातात. जे असीम आहे, तेच परात्पर आहे, तेच ऋत आहे. कारण त्याला सीमा नाही, त्याला केंद्र नाही. ज्याला सीमा आहेत, तो पुरुष आहे, तो सत्य आहे, त्याचे केंद्र हे मन आहे. ज्याला सीमा नाही, अशी परमप्रकृती आहे. तीच ऋत आहे. या परात्पर ऋतापासून सत्य या पुरुषाची निर्मिती झाली. त्या सत्य पुरुषाचे आणि ऋत या प्रकृतीचे आपण अपत्य आहोत, अविभाज्य घटक आहोत. म्हणूनच ईशोपनिषदामध्ये असे म्हटले आहे, '**यो असावसौ पुरुषः सोहमस्मि |**' साक्षात प्रकृतीने असे म्हटले आहे, 'ज्या पुरुषाला आपण मानता, तो पुरुष मीच आहे. म्हणून साधकाला अशी अनुभूती घडवावी की ऋतापासून उत्पन्न

झाला आहे, तो सत्याच्या बीजापासून व स्वयम् सत्यापासून उत्पन्न झाला. देवा मध्येही प्राण आहेत. परंतु सृष्टीच्या प्रारंभासमयी देव प्राण नव्हते, तर सुप्त अथवा सुषुप्त प्राण होते. ज्याप्रमाणे नासदीय सूक्तात असे म्हटले आहे, प्रथम प्राण ऋषी-ऋषिका आहेत, द्वितीय प्राण मातर व पितर आहेत, तृतीय प्राण देव आहेत. "**ऋषिभ्यों पितरों जाता, पितृभ्यो देवदानवा:|**" साधकाने स्वतःला देवतापूर्वीचे कथित करणे म्हणजेच ऋत असल्याचे कथित करणे, हे उचितच आहे. आत्मा सृष्टीच्या पूर्वकालामध्ये होता, परंतु ऋताच्या स्वरूपात त्यानंतर सत्याच्या स्वरूपात तो आत्मा प्रकटला. त्यानंतर सृष्टीरूपामध्ये अनंत आत्मे विस्तारले, त्यानंतर देवता प्रकटल्या. म्हणूनच आत्मा अमृत व अजन्मा आहे.

ऋत व देव या संकल्पना समजून घेतल्यानंतर अन्न व अन्नाद यांचा अर्थ समजून घेऊया. अन्नादचा अर्थ असा आहे की भोक्ता, अन्न अथवा अन्य भोग, सुखसुविधा ग्रहण करणारा. अन्न म्हणजे भोग्य पदार्थ, भोग, सुखसुविधा. जो एकाचा भोक्ता असेल तर तो निश्चितच दुसऱ्याचे अन्न असेल. उदा. मृग हे

तृणभोक्ता असते, मात्र मृगेंद्राचे अन्न असते. मृग हे तृणाचे अन्नाद, तर मृगेंद्राचे अन्न असते. जगतामध्ये अशीच अन्न-अन्नादाची शृंखला सुरू आहे. अन्नादाला म्हणजे अन्न ग्रहण करणाऱ्या व्यक्तीला अग्नि म्हटले जाते, कारण अन्न ग्रहण करण्याचे कार्य जठराग्नि करते. अन्नाला सोम म्हटले जाते कारण ते गृण्हित असते. अग्निचे कार्य विकास (विस्तार) तर सोमाचे कार्य संकोच (आकुंचन) असते. विकास चरम सीमेला असल्यास तो संकोचात परिणत होतो, तर संकोचही परम सीमेला पोहोचल्यास विकासामध्ये परिवर्तित होतो, त्याचप्रकारे अग्नि सोममध्ये व सोम अग्निमध्ये परिवर्तित होत असतो. म्हणूनच सोमाने अग्निला म्हटले आहे की मी तुझाच आहे व मित्रतेमध्ये मी तुझ्या पेक्षा कनिष्ठ आहे. "**अग्निर्जागार तमयं सोम आह- तवाहमस्मि सख्ये न्योकाः ||** सोम स्वतःकडे कनिष्ठ स्थान घेत आहे. कारण सोम हे भोग्य आहे व सुख-सुविधा, अन्नपदार्थ या सर्वांचा वाहक आहे व भोग्य भोक्तापेक्षा कनिष्ठ असते, हीच बाब नासदीय सूक्तात सांगितली आहे. "**स्वधावस्तात प्रयातः परस्तात् |**" स्वधा म्हणजे भोक्ती. प्रयतापेक्षा महान आहे, कारण प्रयति हे

भोग्य आहे. सेतुसामाच्या या ऋचांचा अर्थ  समजून घेतल्यानंतर आपण  सेतुसामातील आदेश समजून घेऊया. कारण हे चारही आदेश सार्वभौम आहेत. हे आदेश अनंत आहेत, शाश्वत आहेत, सार्वत्रिक आहेत, अविनाशी आहेत. हिंदू धर्माच्या मुख्य पंथांमध्ये म्हणजे जैन, बौद्ध, शीख आदिंमध्ये हेच आदेश सार्वत्रिकरित्या आढळतात. त्यामध्येही लोभाला दानाने, क्रोधाला प्रेमाने, संदेहाला श्रध्देने, तसेच असत्याला सत्याने परास्त करण्याचे आदेश दिले आहेत. भारत वर्षांमध्ये जन्मलेले तीनही पंथ शीख, जैन व बौद्ध- जे अवैदिक मानले जातात, त्यांच्यामध्येही वैदिक आदेश व संकल्पना आढळतात. जसे की सत्य, शौर्य, अपरिग्रह, अस्तेय, मुक्ति, श्रद्धा इत्यादी.

## इन्द्रसूक्त / बृहत्साम

हे सुक्त इंद्रदेवाच्या स्तुती, कीर्ती, प्रार्थना आणि पूजनावर आधारित आहे. या सूक्ताची ऋषिका विश्वमना वैयश्व आहे, हे सूक्त सामवेदाच्या पूर्वार्चिकामध्ये आढळते. याशिवाय हे सूक्त द्वितीय पर्वातील म्हणजेच ऐन्द्रपर्वातील चतुर्थ अध्यायातील अष्टाविंश (२८) व व एकोनत्रिंश खण्डामध्ये (२९) आढळते. हे सूक्त अत्यंत महत्त्वाचे स्तुतिपर सूक्त आहे. यामध्ये निऋती, सोमदेव, ऋत्विज म्हणजेच ऋषिगण, स्तोता म्हणजे स्तुति गायक, याजक-यजमान आदिंची ही स्तुती केली आहे. म्हणूनच या सूक्ताला निऋति सूक्त अथवा सोमसूक्त असेही संबोधता येईल. या सूक्तामध्ये पाच ऋचा असून याची देवता इंद्र व दध्रिका आहे. ह्या सूक्ताचा छंद उष्णिक् असून ह्या सूक्ताला बृहत्सामाचा दर्जाही दिला जातो. कारण यात इंद्रस्तुती आहे. या ऋचा पुढीलप्रमाणे :-

**एदु मधोर्मदिन्तरं सिंचाध्वर्यो अन्धसः |**

**एवा हि वीरस्तवते सदावृधः |**

**एन्दुर्मिन्द्राय सिंचत पिबाति सोम्यं मधु |**
**प्र राधांसि चोदयते महित्वना ||**

**एतो न्विद्रं स्तवाम सखाय: स्तोम्यं नरम् |**
**कृष्टीयों विश्वा अभ्यस्त्यके इत् ||**
**सखाय आ शिषामहे ब्रम्हेंद्राय वज्रिणे |**
**स्तुष ऊ षु वो नृतमाय धृष्णवे ||**

**पेत्थां हि निऋतिनां वज्रहस्त परिवृजम् |**
**अहरह: शुन्ध्यु: परिपदामिव ||**

ह्या साममंत्राचा राग बव्हंशी मेघ असावा. या साममंत्राची रागिणी पूर्वी ही असावी. या साममंत्राचे चक्र वसुचक्र असावे अथवा आदित्यचक्र असावे. कारण आदित्य चक्रात व

वसुचक्रातही मेघ राग व पर्जन्य राग आढळतात. यातील पहिले चार मंत्र सामवेदाच्या पूर्वार्चिक संहितेतील ऐंद्र पर्वातील चवथ्या अध्यायातील अष्टाविंश खंडात (२८व्या) आढळतात, तर शेवटचा साममंत्र हा त्याचा ऐन्द्रपर्वातील चतुर्थ अध्यायातील एकोणत्रिंश खंडात (२९व्या) आढळतात. हे श्लोक वैयश्व ऋषींच्या अथवा देवतेच्या कन्येने अथवा पत्नीने म्हणजेच विश्वमनेने रचलेले आहे.

यातील पहिल्या साममंत्राचा अर्थ असा आहे की मधुर सोमपानाने आनंदित होणाऱ्या इंद्रदेवांना आपण हा विशिष्ट रस अर्पण करावा, ऋत्विजगणहो! हा विशिष्ट रस कदाचित पुरोडश अथवा सायान्न असावा. पुरोडश म्हणजे विभिन्न मिष्टांन्नांचे आणि रसांचे मिश्रण, तर सायान्न म्हणजे दुग्धजन्य पदार्थांचे मिश्रण. हे ऋत्विजगणहो! आपण प्रदान केलेल्या मधुररसाचा असा प्रभाव घडेल की इंद्रदेव, जो पराक्रमी असून सदोदित वृध्दीदायक, स्तुतीपात्र आहे, ते अत्याधिक प्रसन्न होतील.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, परमानंदाने परिपूर्ण असणाऱ्या परमात्मा व परम प्रकृतीला आपण विशिष्ट समर्पण, प्रेम, भक्ती,

निष्ठा, श्रद्धा व मेधा अर्पण करावी, साधकहो! जेणेकरून परमात्मा व परम प्रकृती उत्तम अनुभूती व उत्तम लोक प्रदान करतील. हे उभयंता स्तुतीपात्र व वृध्दीदायक आहेत.

दुसऱ्या साममंत्राचा अर्थ असा आहे की हे ऋत्विजगणहो! आपण हा सोमरस अर्पण करावा, जेणेकरून इंद्रदेव हा मधुर सोमरसपान करतील, त्या कारणाने त्याला प्रसन्नता प्राप्त होईल, आपल्या सर्वांच्या भक्तीकारणे, ते इंद्रदेव सर्व याजकांना-यजोगणांना विपुल धन प्रदान करतील, आपणा सर्वांच्या जीवनातील विपदा- कष्ट दूर करतील.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे साधकहो! योगीजन, सिध्दगणहो व संन्यासीहो! परमात्मा व परमप्रकृतीला आपण भक्तिरस अर्पण करावा, जेणेकरून हे उभयंता आपणास अद्भूतरसाची अर्थात परमानंदाची अनुभूती देतील.

तिसरा साममंत्राचा अर्थ आहे की हे मित्रहो! शीघ्र यावे, आपण सर्वजण मिळून एकत्रितपणे स्तुत्य असलेल्या श्रेष्ठ नायक इंद्रदेवांची प्रार्थना करूया, जो एकटाच सर्व शत्रूंना परास्त करण्यासाठी सक्षम आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे मित्रगणहो! साधक, सिद्धयोगी व शिष्यगणहो! आपण सर्वजण मिळून एकत्रितपणे सदैव स्तुत्य-त्रिकालाबाधित स्तुत्य असलेल्या सर्वश्रेष्ठ नयकारी असलेल्या परमात्मा- प्रकृतीची प्रार्थना करूया, जे एकटेच पर्याप्त असतात, विकार, दुष्टता, अमंगलता, दुर्जन, कुविचार, वासनांचा संहार करण्यासाठी! हेच त्रिकालसत्य आहे.

चौथ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे मित्रहो! वज्रधारण करणाऱ्या इंद्रदेवाची स्तोत्रांच्या आधारे स्तुती करत असता, आपण सर्वजण त्यांच्या आशीर्वाद, कृपा, आशिष आणि वरदानांचे इच्छुक आहोत. श्रेष्ठवीर असणारे इंद्रदेव- जे शत्रूंना पराजित करतात. अशा इंद्रदेवाचे स्तवन आम्ही याकरिता करत आहोत, जेणेकरून ते सर्वांचे कल्याणच करतील.

या साममंत्रांमध्येही विश्व कल्याणाची ऋचा सामावलेली आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे विश्वजनहो! आम्ही सर्व साधक, सिद्ध, योगी तथा संन्यासी, सृष्टीला जन्म देणाऱ्या, त्याचे परिपालन करणाऱ्या परमात्मा- परम प्रकृतीचे स्तवन करत आहोत, आम्ही सर्वजण या परमात्मा व परमप्रकृतीच्या

आशीर्वादाची इच्छुक आहोत, आमच्या मनी इतकी आकांक्षा आहे की आपण उभयतांची कृपा लाभावी, सर्वश्रेष्ठ वीरांचे, स्वामी- स्वामींनी, जे षडरिपुंना पराजित करतात, त्या परमात्मा व परमप्रकृतीची स्तुती आम्ही याकरिता करत आहोत, जेणेकरून विश्वाचे कल्याण व्हावे.

यातील पाचव्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे वज्रधारी इंद्रदेवा! आपण विघ्नकारक तत्त्व, शक्ती, व्यक्ती, मूल्यांना दूर करण्याचा अथवा नष्ट करण्याचा मार्गाविषयी जाणताहात, त्याविषयी आपणास पूर्णपणे ज्ञान आहे. आपल्या पवित्रता, शुद्धता व शक्तीच्या सामर्थ्याने आपत्ती, रोग, दुष्प्रभाव व अधर्माच्या प्रभावास नष्ट करण्यास अथवा दूर करण्यास ज्याप्रमाणे मनुष्यही सक्षम ठरतो, त्याप्रमाणे हे देवा! तूही तितकाच समक्ष, समर्थ आहेस!

या साममंत्रामध्ये मनुष्याच्या नैतिक बळ, शक्ती, अध्यात्मिक सामर्थ्य व शुद्धतेचा तितका आदर केला आहे, जितका देवतांच्या शक्तीचा केला जातो.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता असे लिहिण्याची आवश्यकताच नाही. कारण हा साममंत्र पूर्णत: आध्यात्मिकच आहे.

हे सूक्त अथवा बृहत्साम अत्यंत महान आहे. कारण हे इंद्रस्तुती सूक्त फक्त आध्यात्मिक बृहत्स्तुतीपरच नव्हे, तर वैज्ञानिक दृष्ट्या, मनुष्यहित, मनुष्याच्या नैतिक, मानसिक, आध्यात्मिक दृष्ट्या सामर्थ्याच्या बुद्धीच्या दृष्ट्या, जीवनोत्थानाच्या व जनोत्थानाच्या दृष्ट्या महत्त्वपूर्णही आहे. हे वैज्ञानिक याकरिता कारण स्वरांचे, जीवनाचे, मनाचे व विश्वाचे विज्ञान विहित आहे. मनुष्याने सर्वांच्या व तत्पूर्वी स्वतःच्या हिताकरिता कार्य करावे, असा आशय या ऋचांतून साममंत्रामधून चित्रित होतो. हे बृहत्सामाच्या योग्यतेचेच सूक्त आहे.

# सोम सूक्त / सामसोम

ह्या सूक्तास सोमसूक्ती अथवा सामसोम असेही म्हटले जाते. असे सोमसूक्तीपर अथवा सोमप्रार्थना सोमवाहनपर साममंत्र अनेक आहेत, मात्र हेच साममंत्र मला महत्वाचे वाटले. कारण यामध्ये फक्त सोमाचीच नव्हे, तर सूर्य, अन्न, तेज, रश्मी, प्रकृती व यज्ञाची स्तुती व आवाहन केले आहे. ह्या सोमसामामध्ये फक्त तीनच साममंत्र आहेत. या सूक्ताची ऋषिका व ऋषि ऋजिश्वा भारद्वाज आणि वार्षागिर आहेत. ह्या सूक्ताचा छंद अनुष्टुप आहे. ह्या सूक्ताची देवता पावमान सोम आहे. ह्या सूक्ताचा राग बव्हंशी दीपक अथवा किरवाणी असावा. ह्या सूक्ताची रागिणी भैरवी असावी. या सूक्ताचे चक्र ब्रम्ह अथवा वेद असावे कारण या दोन्ही चक्रामध्ये किरवाणी व दीपक राग आढळतो.

हे सूक्त सामवेदाच्या उत्तरार्चिक भागात नवम अध्यायातील अष्टम खंडात आढळते. ह्या सूक्तामध्ये फक्त तीन सोममंत्र अथवा ऋचा आहेत. ह्या ऋचा अथवा सोममंत्र नवम अध्यायातील अष्टम खंडातील १२३८, १२३९, १२४० व्या आहेत. या

साममंत्राना मी सूक्तरुपाने सोमसूक्ताच्या रुपात परिभाषित केलेले असले, तरी हे साममंत्र सामवेद, उत्तरार्चिक आणि पूर्वार्चिक भागातील सोम अर्थातच पावमान पर्वापासूनही पृथक नव्हेत. खरं पाहता, कुठलाही वेदमंत्र अन्य वेदमंत्रापासून पृथक नव्हेच. कारण ऋग्वेदातील काही ऋचा यजुर्वेदामध्ये यजुषरुपाने आढळतात, तर काही यजुष सामवेदातील साममंत्ररुपाने आढळतात,तर काही साममंत्र अथर्ववेदामध्ये अथर्वमंत्ररुपाने आढळतील.

हे सूक्त पुढीलप्रमाणे :-

**अभी नो वाजसतमं रयिमर्ष शतस्पृहम् |**
**इन्दो सहस्त्रभर्णसं तुविद्युम्नं विभासहम् ||**

**वयं ते अस्य राधसो वसोर्वसो पुरुस्पृहः |**
**नि नेदिष्ठतमा इषः स्याम सुम्न ते अधिग्रो ||**

**परि स्य स्वानो अक्षरदिन्दुरव्ये मदच्युतः |**
**धारा य ऊर्ध्वो अध्वरे भ्राजा न याति गव्ययुः ||**

यातील पहिल्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे तेजस्वी सोमदेवते! सर्वप्रथम सोमचा अर्थ पाहिला पाहिजे. सोमचा अर्थ

मुंजवान पर्वतावरुन आलेली दिव्य वनस्पती. मौजवत्-जिचा रस यज्ञ, पान, आदिकरिता उपयुक्त केला जातो. चंद्रमा, सौम्यतेची देवता, याशिवाय ऋग्वेदामध्ये स्तुती बध्द असलेली, सूर्याप्रमाणे प्रकाशमान, वेगवान, जेता व योध्दा देवता. याखेरीज सोमदेवतेला स्त्रीदेवताही मानले जाते, म्हणूनच तिला सौम्या, क्षीरी, द्विजप्रिया, यशश्रेष्ठा, यज्ञान्हा, वायुदेवता आदि नामांनी संबोधित केले जाते.

तर अशा सोमदेवते! आपण आम्हाला असे श्रेष्ठ ऐश्वर्य प्रदान करा, जे सतजनांद्वारे स्तुत्य, सहस्त्रजनांचे पालन-पोषण करण्यासाठी समर्थ, तेजस्वी व यशवर्धक असेल. अर्थातच ही प्रार्थना फक्त धनऐश्वर्यासाठी नव्हे तर गुण, शक्ती, सामर्थ्य आणि नीतीमत्तारुपी ऐश्वर्यासाठीही आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे तेजःपुंज आदिशक्ती! आपण आम्हांला असे श्रेष्ठ सद्गुण, तेज, सामर्थ्य आणि अनुभूती प्रदान करा, जे शत साधकांद्वारे स्तुत्य, सहस्त्र योग्यांचे-सिध्दांच्या आदेशाचे अनुसरण करण्यासाठी समर्थ आणि धर्मवर्धक असेल. आपण आम्हांला हिंदू धर्मपालन व हिंदू धर्मवृध्दिकरिता पूरक असलेले गुण, तेज, सामर्थ्य व नीतीमत्ता प्रदान करावी.

यातील दुसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे उत्तम आश्रयदायक सोमदेवते! सर्वांद्वारे प्रशंसित व वांछित, सर्वांकरिता पोषक असलेली आपली तत्त्वे, मूल्य, कृपाप्रसाद व विभूती आम्ही प्राप्त करु इच्छित आहोत.

आपल्या कृपापात्र असलेले व सर्वांना आशीर्वाद तथा कृपा प्रदान करणाऱ्या भक्त, साधक, योगी व सिद्ध जणांच्या सानिध्याचे इच्छुक आहोत, हे सोमदेवते! आपण सूर्याच्या रश्मी अर्थात किरणांसह निवास करतात. तुमच्याद्वारे प्रदत्त पोषक पदार्थाद्वारे आमचे पोषण व सुखवर्धन होवो.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, हे उत्तम देहदायक परमप्रकृती! सर्वांद्वारे स्तुत्य व इच्छित, सर्वांकरिता आनंददायक असलेली अध्यात्मिक अनुभूती, परमानंद सिद्धलोक व सिद्धीचे आम्ही इच्छुक आहोत. आपल्या कृपापात्र असलेल्या साधुजनांच्या सहवासाचे आम्ही इच्छुक आहोत. सूर्य आणि रश्मीच्या माता असणाऱ्या आदितीस्वरूपा आदिशक्ती! आपणाद्वारे आम्हा सर्वांचे पोषण, स्वरक्षण व जनन व्हावे. हे माते! तुझ्याद्वारे प्रदत्त

असणाऱ्या पोषकपदार्थाद्वारे आमचे पोषण होवो. याखेरीज आम्हाला सौख्य, समृद्धता प्रदान करावी.

या सोममंत्रेमध्ये अन्नाला तसेच पोषक पदार्थाला विशेष महत्त्व दिले आहे.

यातील तिसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की सूर्याच्या सहस्त्र रश्मींची कामना करणाऱ्या व त्यांना धारण करणारी स्वाभाविक, साहजिक तेजाने युक्त असणारी श्रेष्ठ देवता सोमधारा, हवि, हविष्य, हवी ग्रहाच्या (हवि ग्रहण करणारा) रूपांमध्ये यज्ञाकरिता यज्ञवेदीवर आगमन करते. अध्वर, पुरोहित, याजक व यजमानांना आनंदित व रक्षित करण्यासाठी प्राकृतिक रीतीने सोमाचे आगमन होते.

अध्यात्म दृष्टीने पाहता, अनंत तेजाने परिपूर्ण असणारी व सर्वांना तेजोशक्ती प्रदान करणारी, सूर्याच्या सहस्त्र रश्मींना उत्पन्न करणारी आदिशक्ती-परमप्रकृती धारा (नदी), हवि (त्याग) समृद्धता हविष्या (योध्दाशक्ती) हविग्रहाच्या म्हणजे स्त्रीच्या रुपामध्ये या पृथ्वीवर अवतरते, ते सर्वांना जीवन, शक्ती, तेज, सामर्थ्य प्रदान करण्यासाठी.

# सोमप्रार्थनासूक्त

ह्या साममंत्रामध्येही सोमाची स्तुती व प्रार्थना आहे, तरीही या सूक्तामध्येही इंद्रदेव, वसतीवरी (यज्ञाची विभूती -देवता) याजक, हरिताभ, तेज आणि यज्ञाची स्तुती केली आहे. याखेरीज हे सोमस्तुतीपर साममंत्र असले, तरी यामध्ये मला नूतनता व विभिन्नता जाणवली म्हणूनच मी ह्या देखील सोमसूक्ताचा उल्लेख केला आहे. ह्यातील साममंत्र सामवेदाच्या उत्तरार्चिक संहितेतील अष्टम अध्यायाच्या चतुर्थ खंडामध्ये आढळतात. ह्या साममंत्राच्या ऋषिका सिकता निवावरी आहे. ह्या साममंत्राची देवता पवमान सोम असून जगति छंद आहे.

या साममंत्राचा राग श्री व रागिणी भैरवी अथवा चारुकेशिका असावी. या साममंत्राचे चक्र वनचक्र असावे. कारण या चक्रामध्येच चारुकेशिका राग व रागिणीही आढळते. या साममंत्राचे गायन सुलभरितीने करता येणे काहीसे जटिल आहे. कारण हे साममंत्र फक्त तीन असले, तरी ते अल्पाक्षरी नव्हेत. यातील फक्त साममंत्राच्या दोन ऋचांमध्ये यमक आहे, याखेरीज

हे साममंत्र चतुर्थ खंडातील ११५२, ११५३, ११५४ वे आढळतात. ह्या देखील साममंत्राचा उपयोग यज्ञामध्ये आहुती दिली देतासमयी केला जातो. प्रत्येक सोमस्तुतीपर सोममंत्राचा प्रयोग हा सामयागामध्ये अथवा वाजसनेय यज्ञामध्येही केला जातो.

हे सूक्त पुढीलप्रमाणे :-

**प्रो अयासीदिन्दुरिन्द्रस्य निष्कृतं सखा सख्युर्न प्र मिनाति सगिंरम्|**

**मर्य इव युवतिभि: समर्पति सोम: कलशे शतयामना पथा||**

**प्र वो धियो मन्द्रयुवो विपन्युव: स्युव: संवरणेष्णक्रमु: ||**

**हरिं क्रिडन्तमभ्यनुषत स्तुतोभि धेनव: पयसेदशिश्रुयु:||**

**आ न: सोम संयतं पिप्प्युषीमिषमिन्दो पवस्व पवमान उर्मिणा|**

**या नो दोहते त्रिरहन्नसश्चुषी क्षुमद्वाजवन्मधुमत्सुवीर्यम्||**

यातील प्रथम साममंत्राचा असा अर्थ आहे की अनेक प्रकारांनी शुध्द झालेला सोमरस इंद्रदेवाच्या उदरामध्ये प्रविष्ट होतो, म्हणजेच सोम हा रसरुपाने इंद्रादि देवता, ऋषिगणांच्या उदरात प्रविष्ट होतो. मधुर मित्ररुपाने सोमरस आपल्या मित्राच्या म्हणजेच इंद्रदेवाच्या उदरात प्रवेशतो, त्याकारणे इंद्राला पीडा होत नाही. (सहज अनुभव होतो) ज्याप्रमाणे पुरुष आपल्या सखी, प्रेयसीसह विचरण करत असतो,. त्याप्रमाणे सोम, हविष्य, रससायान्न, वसतीवरी म्हणजे यज्ञाची देवता, विभूती व यज्ञाच्या कल्पिताच्या रुपाने अशा अनंत रुपांनी अभिषुत म्हणजे विभाजित. होऊन अनेक मार्गांनी कलशामध्ये प्रविष्ट होतो.

अध्यात्म दृष्टीने पाहता, सोमाला ‘चंद्रमा’ ही म्हटले जाते. मनाचे प्रतीक चंद्र आहे. त्याकारणे अनेक प्रकारांनी शुध्द झालेले, अनेक संकटांना -दुविधांना पार केलेले मन परमात्म्याच्या ज्ञातलोकांमध्ये म्हणजे आत्म्याचे समीप पोहोचते, महाकारणासमीपही पोहोचते. मात्र त्याक्षणी मन शुध्द असल्याकारणे आत्मा, महाकारणदेह, संचित व बुध्दीला त्याच्या

प्रवेशाकारणे पीडा होत नाही. त्याप्रमाणे बुद्धी अनेक मार्गांनी मनुष्यास प्रगत व विकसित करते, त्याप्रमाणे मनही तप साधना, जप, कर्मकांड, पुण्यकर्म, ज्ञानार्जन आदि मार्गांनी शुध्द होऊ शकते व आत्मा -परमात्मासमीप जाऊ शकतो.

यातील दुसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे सोमदेवते! आपले ध्यान करणारे, आनंदपूर्वक आपली स्तुती करणाऱ्या अभिलाषेने यज्ञ करणारे याजक/ यजोमती,. यजमान ज्याक्षणी यज्ञस्थलामध्ये म्हणजे यज्ञवेदीवर यज्ञ करताना तरंगित हरिताभ (म्हणजे विष्णू -लक्ष्मीला प्रिय असणाऱ्या हरित तेजाची आभा असणारा सोम) सोमरसाला संस्कारित करतात, त्याक्षणी गोमाता आपले दुग्ध प्रदान करुन या सोमाची सेवा करतात म्हणजे दुग्ध सोमरसामध्ये मिसळले जाते.

अध्यात्म दृष्टीने पाहता, परमप्रकृती आपले ध्यान करणाऱे व स्तुती करणारे भक्त व साधक ज्याक्षणी आपल्या मनाला व भक्तीला संस्कारित करतात, त्याक्षणी सत्प्रवृत्तीही त्यात आपले योगदान प्रदान करतात.

यातील तिसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे पवित्र असणाऱ्या सामदेवते! दिनांच्या तीन प्रहरांमध्ये म्हणजे सवनांमध्ये प्रयुक्त, जे अन्न प्रशंसित, बलवर्धक, मधुर, कामोत्तेजक तथा उत्तम पुत्र प्रदान करणारे म्हणजे प्रजननक्षमता विकसित करणारे आहे. अशा आमच्या अन्नाला आपण आपल्या तरगांनी शुध्द व पोषक करावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे आदिशक्ती! शरीराच्या नऊ गति व मनाच्या बत्तीस नाड्यांमध्ये स्थित, बलवर्धक, शक्तीजनक व प्रतिभोत्पाक असलेल्या चेतना शक्तीच्या लहरींना तू शुध्द करावेस. याखेरीज हा साममंत्र वैज्ञानिकही आहे. कारण या मंत्रात प्रजननक्षमतेच्या विकासाच्या उल्लेखही आहे. याखेरीज उत्तम वैवाहिक जीवनासाठी कामात्तेजनेचीही आवश्यकता असते हेही या मंत्रात उल्लेख आहे.

# पवमानभूषण सूक्ति

हेही देखील सूक्त सोमस्तुतीपर आहे. हे सूक्त म्हणजेच हे साममंत्र मला महत्वपूर्ण वाटले, कारण ह्या साममंत्रामध्ये फक्त सोमाचीच नव्हे तर सोमास सहाय्यभूत ठरणाऱ्या मित्र, वरुण, यज्ञ, इंद्र अशा देवतांची व ऋत्विजगणांची स्तुती आहे. याखेरीज सिक्ता निवावरीच्याच सूक्ताप्रमाणे यामध्ये सुंदर उदाहरण अथवा रूपक देऊन सोम, मित्र, वरूण, इंद्र आदींची महती कथित केली आहे. हे सूक्त साम वेदाच्या उत्तरार्चिक सहिंतेतील अष्टम अध्यायाच्या पंचम खंडामध्ये आढळते. या सूक्तामधेही तीन मंत्र आहेत. या सूक्ताची ऋषिका व ऋषी शिखंडिनी- काश्यपी व पर्वत- नारद असून या शब्दाची देवता पवमान सोम आहे. हया साममंत्राचा छंद उष्णिक् असून या साममंत्राचा राग दीपक व रागिनी पूर्वी असावी. ह्या साममंत्राचे चक्र वेद असावे. कारण हे साममंत्र अत्यंत पवित्र आहेत. या साममंत्राचे गायन सुलभ रीतीने करता येते. कारण याच्या दोन्ही चरणांमध्ये यमक नसले तरी एक मधुर गेयता आहे.

हे सूक्त पुढीलप्रमाणे :-

**सखाय आ नि षीदत पुनानाय प्रगायत |**

**शिशुं न यज्ञै: परिभूषत श्रिये ||**

**समी वत्सं न मातृभि: सृजनता गयसाधनम् ||**

**देव्याव्यं इ मदताभि द्विशवसम् ||**

**पुनाता दक्षसाधनं यथा वर्धाय वीतये |**

**यथा मित्राय वरुणाय शन्तनम् ||**

यातील पहिल्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे मित्रांनो! म्हणजे ऋत्विजगणहो! यज्ञवेदीवर आसनस्थ होऊन पवित्र होण्याऱ्या सोमदेवतेची स्तुती करावी. पित्याद्वारे पुत्राला व मातेद्वारे पुत्रीला अलंकृत करण्याप्रमाणे सोमाला हवि, हविष्य, दुग्ध, पायस या व आदि पदार्थाद्वारे यज्ञामध्ये विभूषित करावा.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे साधक, सिध्दगणहो, योगीजनहो व भक्तांनो! समस्त विश्वाच्या कणामध्ये -कणामध्ये स्थित असणाऱ्या परमप्रकृती व परमात्म्याची स्तुती करा.

आपल्या माता-पिताद्वारे आपल्या पुत्रा-पुत्रींना अलंकृत करण्याप्रमाणे आदिशक्ती व परमात्म्याला अनेक स्तुती व सूक्तांनी अलंकृत करावे.

यातील दुसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे ऋत्विजगणहो! गृहाच्या व विश्वाच्या साधनाभूत दिव्य गुणांचे रक्षक, ज्ञानवर्धक, आनंदवर्धक, दोन्ही प्रकारांनी (दिव्य व पार्थिव) म्हणजे आध्यात्मिक व आधिभौतिक तऱ्हेने बलवर्धक अशा सोमाला त्याप्रकारेच जलामध्ये मिश्रित करा, ज्याप्रमाणे मातेसह पुत्र-पुत्री वास करतात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे योगीजनहो! भक्तगणहो! सिध्दगणहो! साधुगणहो! आपण ह्या विश्वामध्ये दिव्य गुणांची रक्षक, आनंददायिनी व बलप्रदायिनी आदिशक्तीला, परमप्रकृतीला सहस्त्राचक्रावर व ब्रम्हरंधावर आवाहन करा, त्रिविध व नवविधा भक्तीने, तिच्याशी इतके एकरुप व्हा, जितके पुत्र-पुत्री, शिष्य-शिष्या आपल्या माते व गुरुशी एकरुप असतात.

यातील तिसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे ऋत्विजगणहो! गतीशीलता प्राप्त करण्यासाठी, देवतांना दिव्य ज्ञान प्रदान करण्यासाठी, अधिकाधिक त्यांना सुखप्रदायक, बलदायक, आनंदप्रदायक व शक्तीदायक करण्यासाठी, त्यांच्या बलवृध्दीकरिता आणि मित्र तथा वरुण देवतांच्या साहचर्याकरिता सोमाचे सेवन व शोधन करा. कारण मित्र व वरुण सोमासंबधित देवता आहे. पूर्वी देवता बलवृध्दीकरिता सोमाचे शोधन व सेवन करत असत.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे योगीजनहो! देवतांच्या अंशाला- मनुष्याला साधनेमध्ये व जीवनामध्ये गती प्राप्त करण्यासाठी, परमशक्तीच्याद्वारे दिवज्ञान प्रदान करण्यासाठी, मनुष्यांना अधिकाधिक नैतिक, आध्यात्मिक, शक्तीवान व प्रतिभावान करण्यासाठी, त्यांच्या तपस्येत- बलामध्ये वृद्धीकरिता व साधक, सिद्ध, भक्तांच्या कार्याला हातभार घालण्याकरिता, आपल्या धर्म-संस्कृतीची - पंथाची दीक्षा द्या, मनुष्याला.

# अग्नि स्तुती

हे सूक्त अथवा साममंत्र अत्यंत सुंदर व महदाशदायक आहे. हे सुक्त अग्निस्तुतीपर आहे. या सूक्ताचे साममंत्र सामवेदाच्या विविध भागांमध्ये आढळतात. यातील प्रथम व द्वितीय साममंत्र सामवेदवेदाच्या पूर्वार्चिक भागातील आग्नेय पर्वातील प्रथम अध्यायातील प्रथम व पंचम खंडामध्ये आढळतात आणि तृतीय व चतुर्थ साममंत्र उत्तरार्चिक भागातील पंचदश अध्यायांमध्ये द्वितीय खंडामध्ये आढळतात. या साममंत्राची देवता अग्नी असून ऋषी-ऋषिका सुदिती व पुरुन्मीळ आहे. प्रथम, द्वितीय व तृतीय साममंत्राचा छंद गायत्री आहे. द्वितीय साममंत्राचा बृहती छंद आहे. या साममंत्राचे चक्र अग्निचक्र असावे. या साममंत्राचा राग रुद्र व रागिनी भैरवी असावी. कारण ही रागिनी व हा राग अग्निचक्रामध्ये आढळतात.

ह्या सूक्ताच्या म्हणजे सोममंत्राच्या चरणांमध्ये कोठल्याही प्रकारचे यमक नाही, तरीही वेदांच्या प्रत्येक सूक्तामध्ये गेयता असतेच.

हे सूक्त पुढीलप्रमाणे :-

**त्वं नो अग्ने महोभि: पाहि विश्वस्वा अराते: |**
**उत द्विषो मर्त्यस्य ||**

**अग्निमीडिष्वावसे गाथाभि: शीरशोचितम् |**
**अग्निं राये पुरुमीळ श्रुतं नरोग्नि: सुदीतये छर्वि: ||**
**अज्छा न: शीरशोयिषं गिरो यन्तु दर्शतम्|**
**अज्छा यज्ञासो नमसा पुरुवसुं पुरुप्रशस्तमूतये ||**

**अग्नि सुनु सहसो जातवेदसं दानाय वार्याणाम् |**
**द्विता यो भूदमृतौ मर्त्येष्वा होता मन्द्रतमो विशि||**

यातील प्रथम साममंत्राचा असा अर्थ आहे की हे अग्नि! विश्वाचा, धर्माचा, नीतिमत्तेचा, सज्जनांचा, सत्याचा व स्त्रीचा तिरस्कार- द्वेष करणाऱ्या व्यक्तीच्या तथा शत्रूंचा आपण विनाश

करावा. त्यांच्यापासून आपण आमचे रक्षण करावे आणि आपण विपदाजनक परिस्थितीमध्ये आम्हाला धैर्यवान करावे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे परमप्रकृती व परमात्मा! ह्या ब्रम्हांडाचा, धर्माचा, संस्कृतीचा व नीतिमत्ताचा, स्त्रियांचा पर्यायाने शक्तींचा व परब्रम्हाचा जो अनादर करेल, त्यांचा आपण विनाश करावा. त्याचे आचरण, शब्द, योजना व कारस्थानापासून आमचे रक्षण करावे व आपण आम्हाला धैर्य प्रदान करावे.

यातील द्वितीय साममंत्राचा असा अर्थ आहे की हे स्तोतागणहो! विस्तृत व विक्राल ज्वाला असणाऱ्या अग्निदेवाची आपण सर्वजणांनी स्तुती करावी. हे उद्गातागणहो! ऋषिका सुदीती व पुरूमीळ ऋषीद्वारे केल्या गेलेल्या स्तुतीद्वारे धन तथा श्रेष्ठ प्रकाशयुक्त आवास प्राप्तीकरिता अग्निदेवांची व स्वाहेची स्तुती करा.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे साधकहो! हे भक्तगणहो! योगीजनहो! अध्यात्मिक रचनाकारहो! आपण सर्वव्यापी व सर्वजनक -सर्वविध्वंसक परमात्मा व परमप्रकृतीची स्तुती करावी.

हे सिध्दगणहो! ऋषीद्वारे रचलेले गेलेल्या अपौरुषेय वेदमंत्रांद्वारे परमानंद प्राप्तीकरिता परमप्रकृतीची - परमात्म्याची प्रार्थना करा.

यातील तृतीय साममंत्राचा असा अर्थ आहे की आम्ही केलेल्या प्रार्थना वस्तूंची योग्य प्रकारे प्रज्वलित ज्वालांनी परिपूर्ण आणि दर्शनयोग्य शोकहीन अग्नि देवाच्या व स्वाहेच्या समीप सहजतेने पोहोचाव्यात. आमच्या रक्षणासाठी, विश्वाच्या कल्याणासाठी, धर्मजागृती व धर्मसंस्थापनेसाठी व सज्जनांच्या-स्त्रियांच्या सन्मानासाठी, धृतयुक्त हविष्यांनी-आहुतीने संपन्न केलेले यज्ञ प्रचुर संपदा व रत्नांनीयुक्त असलेल्या अग्नि व स्वाहेला प्राप्त व्हावेत.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे साधक, योगी, सिध्द व भक्तांद्वारे केलेल्या प्रार्थना, साधना, भक्ती व कर्मकांड शक्तीने परिपूर्ण व सुदर्शन असलेल्या शोकविरहित परमात्मा व परमप्रकृतीकडे पोहोचव्यात. सज्जनांच्या रक्षणासाठी, दुष्टांच्या

निर्दालनासाठी, स्त्रियांच्या सन्मानासाठी समर्पण व भक्तीयुक्त मार्गाने केलेली आमची साधना परममाता परमप्रकृती व परमपिता परमात्म्याकडे पोहोचावी.

यातील चतुर्थ साममंत्राचा असा अर्थ आहे की जो अग्नि अमृतत्व प्राप्त असलेल्या देवतांमध्ये समाहित आहे, तो मनुष्यामध्येही त्याचप्रकारे अमृतस्वरुपच आहे. अर्थातच दोन्ही स्थानी तो अमृतरुपच आहे. मनुष्याच्या यज्ञांना, होत्रांना, यागांना व होमांना सफल करणारे आनंददायक सर्वज्ञ अग्निदेवाला धन-धान्य प्रदान करण्यासाठी, त्यांना हविष्य, हवि देण्याकरिता आम्ही तुझे आवाहन करत आहोत, पुत्रा सोमा!

अध्यात्म दृष्टीने पाहता, हा परमात्मा व परमप्रकृती, जे अमृतत्वाचे जनक-जननी आहेत. जे देवतांमध्ये व मनुष्यामध्येही त्याचं अमृतत्वाने व मृततत्वाने समाहित आहेत. साधक व भक्तांच्या मंत्रपठणाला, कर्मकांडाला, भक्तीला व प्रार्थनेला सफल करणारे परमानंदरूप व सर्वज्ञ परमप्रकृती व परमात्मा पुढे समर्पण करण्यासाठी, आम्ही आमच्या मनपुत्राला- विनयाला आवाहन करत आहोत.

# ऐन्द्र स्तुती

ही स्तुती इंद्राच्याच सामर्थ्याचे व सोमाच्या पोषकतेचे स्तवन करणारी असून ही स्तुति अथवा हे साममंत्र सामवेदाच्या उत्तरार्चिक भागातील अष्टादश अध्यायातील तृतीय खंडांमध्ये आढळतात. हे साममंत्र एकूण तीन आहेत या साममंत्राची ऋषिका विश्वमना वैयेश्वा आहेत. या साममंत्राची देवता इंद्रदेव असून या साममंत्राचा छंद उष्णिक् आहे. या साममंत्राचे चक्र वेद अथवा आदित्य असावे. याखेरीज या साममंत्राचा राग मेघ व रागिनी वर्षा असावी. कारण हे राग या चक्रातच आढळतात या साममंत्रातील प्रथम व तृतीय मंत्राच्या चरणांमध्ये यमक आढळते मात्र दितीय साम मंत्रांमध्ये तसे यमक नाही. मात्र तरीही यजुगेयता आहे.

हे सूक्त पुढीलप्रमाणे :-

**एदु मधोर्मदिनारं सिंचाध्वर्यो अन्धसः |**

**एवा हि वीर स्तवते सदावृधः ||**

**इन्द्र स्थातर्हरीणां न किष्टे पूर्व्यस्तुतिम् ।**

**उदानंश शवसा न भन्दना ॥**

**तं वो वाजानां पतिमहमहि श्रवस्यवः ।**

**अप्रायुभिर्यज्ञेभिर्वावृधेण्यम् ॥**

यातील प्रथम साममंत्राचा असा अर्थ आहे हे याजकहो! हे अध्वर्युहो! हा मधुर सुखदायक सोमरसाला इंद्र देवाच्या तृप्तीच्या हेतूने यज्ञवेदीवर प्रस्तुत करावा. यज्ञवेदीवर सोमरस सिंचित करा, हविष्यावर. सामर्थ्यवान शक्तिवर्धक इंद्रदेव स्तुतीयोग्य आहेत, त्यांची स्तुती करा.

अध्यात्म दृष्टीने पाहता हे साधकहो! हे योगीजनहो! हा सुखदायक भक्तीरस परमात्मा व परमप्रकृतीच्या चरणांवर त्यांच्या संतुष्टीच्या हेतूने हृदयाच्या भूमीवर प्रस्तुत करावा. मनाच्या भूमीवर भक्तीरस सिंचित करावा. सामर्थ्यशाली व प्रेरणावर्धक परमात्मा व परमप्रकृती स्तुतीयोग्य व आराध्यसक्षम आहेत.

यातील द्वितीय साममंत्राचा असा अर्थ आहे की हे अश्वपति इंद्रदेव! (तुझ्या) अनेक ऋषिगण व विष्णुदेवाद्वारे प्रणीत स्तुतींना कोणाही सामान्य आपल्या सामर्थ्य व तेजस्वितेने प्राप्त करु शकत नाही. कारण या स्तुतींपुढे सामान्याची तेजस्विता नगण्य आहे. म्हणजेच तुझ्यासमान कोणीच सामर्थ्यशाली व तेजस्वी नाही, इंद्रदेवा! हे देवा!

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे जगतपति परमात्मा व परमप्रकृती! अनेक योगी, भक्त, साधक व भक्तगण स्तोतागणांकडून प्रणीत स्तुतींना, रचनांना कोणीही सामान्य ग्रहण करु शकत नाही. कारण त्याच्यावर इतक्या सहजासहजी योग्यांची कृपा होत नाही परमात्मा व परमप्रकृतीपेक्षा महान तेजस्वी कोणीच नाही.

यातील तृतीय साममंत्राचा असा अर्थ आहे ऐश्वर्याची कामना, इच्छा राखून आम्ही ऋषिप्रणीत स्तुतीमध्ये वैभवशाली इंद्रदेवांचे आवाहन करत आहोत, जे इंद्रदेव याजकांच्या प्रमादरहित यज्ञांकारणे वृध्दी व सृष्टीच्या पोषणाच्या अत्युच्च स्तराला प्राप्त होतात, हेच सत्य आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, परमानंदाची कामना राखून आम्ही साधक योगीजनित साधनेमध्ये परमशक्तीचे व परमात्म्याचे आवाहन करतो आहोत, जे साधकांच्या प्रमादरहित सत्कर्माकारणे सृष्टीच्या आध्यात्मिक सरंचनेत अधिक भर घालतात, ज्यांच्याकरिता साधकांची सत्कर्मेच नैवेद्य असतो.

# सोमस्तुती

ह्या सोममंत्रातही इंद्राच्या पराक्रमाची व सोमाच्या सामर्थ्याची स्तुती केलेली आहे. हे साममंत्र सामवेदाच्या उत्तरार्चिक भागातील अष्टादश अध्यायाच्या द्वितीय खंडांमध्ये आढळतात. हे साममंत्र एकूण चार आहेत. या मंत्राची ऋषिका-ऋषी ऋजिश्वा भारद्वाज, वार्षागिर व वसिष्ठ मैत्रावारूणि आहेत. या साममंत्राची देवता पवमान सोम असून बार्हत प्रगाथ व प्रगाढ, या मंत्राचा छन्द अनुष्टुप् आहे. य साममंत्राचे चक्रही वेद अथवा वसु असावे. या साममंत्राचा राग भैरव व रागिनी पूर्वी अथवा भैरवी असावी. या साममंत्रातील प्रथम साममंत्रांमध्ये फक्त यमक आहे, तरी अन्य साममंत्राचा छन्द अनुष्टुप् असल्यामुळे त्यांना आपोआपच लय प्राप्त होते.

**इन्द्राय सोम पातवे वृत्रघ्ने परि षिच्यसे ।**

**नरे च दक्षिणावते वीराय सदनासदे ॥**

**तं सखाय पुरुरूच वयं यूयं च सूरयः ।**

**अध्यामं वाजगन्ध्यं सनेय वाजयस्त्यम् ||**

**परि त्वं हर्यतं हरिं बभ्रुं पुनन्ति वारेण |**
**यो देवान् विश्वा इत् परि मदेन सह गच्छति ||**

**मघोनः स्म वृत्रहायेषु चोदय ये ददाति प्रिया वसु |**
**त्वं प्रणीती हर्यश्व सुरिभिर्विधा तरेम दुरिता ||**

यातील प्रथम साममंत्राचा असा अर्थ आहे की हे सोमा! वृत्र अर्थात दुराचारी, दुष्टांचे हनन करणारे, पुरोहित, अर्ध्वयू, होतार व याजकांना दक्षिणा देणारे, लोकहितासाठी आपला अंश प्रदान करणाऱ्या पराक्रमी इंद्रदेवाच्या तृप्तीसाठी तथा यज्ञस्थल व रणभूमीमध्ये स्थित असणाऱ्या याजकांच्या व वीराच्या अभीष्ट लाभासाठी तुला या सुपात्रामध्ये स्थिर केले जात आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता असंख्य असुरांच्या म्हणजेच अनेक मनोविकार, षडरिपु, कुविचार, वासना व रोग- व्याधींचा नाश

करणारे साधक, योगिजन, सिद्ध व भक्तांना परमानंद देणाऱ्या व अवतार धारण करून सज्जनाचे कल्याण करणाऱ्या व धर्मस्थापना करणाऱ्या परमात्मा - परमप्रकृतीच्या भक्तीसाठी तसेच साधना स्थळी व आसनावर स्थित असणाऱ्या साधक व भक्ताला अभीष्टासाठी मनाला स्थिर करावे लागते.

यातील दुसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की, हे मित्रहो! तुम्ही व आम्ही आपण त्या पराक्रमी, पौष्टिक, श्रेष्ठ, सुगन्धिने युक्त, शक्तिवर्धक, बुद्धीवर्धक, सामर्थ्यवर्धक व ज्ञानवर्धक सोमरसाला प्राप्त करुया.

अध्यात्मदृष्टीने पाहतां, हे साधकगणहो! मित्रजनहो! सिध्दजनहो! भक्तगणहो! आपण त्या पराक्रमी, मनपोषक, श्रेष्ठ, परिपूर्णत्वाने युक्त, ज्ञानदायी व कर्म सहाध्यायी भक्ती रसाला प्राप्त केले पाहिजे व सर्वांमध्ये विभाजन करून भक्तीचे बीज पेरावे.

या साममंत्रामध्ये असे सांगितले आहे सोमरस हा ज्ञान, शक्ती, सामर्थ्य, बुद्धी, पोषकता व पराक्रम वाढवण्यासाठी ग्रहण केला जायचा म्हणून सोमरसाचा अर्थ कोणत्याही अपअर्थाने घेऊ नये.

यातील तिसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की देवतांचा उल्हास, उत्साह, आल्हाद व सामर्थ्य वर्धित करणाऱ्या, सुंदर, दु:खनाशक, सर्वांचे पोषण करणारा सोमरस शोधक म्हणजे याजक, होत्री, होतार व अर्ध्वयूद्वारे पवित्रता प्राप्त करतो, यज्ञवेदीवर स्थिर होत असतो व हवनकुंडामध्ये स्थापित केला जातो.

अध्यात्म दृष्टीने पाहता, साधकांच्या, भक्तांचा, योग्यांचा व मित्रांचा उल्हास उत्सव व भक्ती वडीत करणाऱ्या सुंदर, दु:खनाशक व सर्वांचे पोषण करणाऱ्या कुंडलिनीचे प्रशोधन, आत्मशक्ती, मेधा, प्रज्ञा व सत्रावीद्वारे ही पवित्रता प्राप्त करत ब्रह्मरंधापर्यंत मुलाधारापासून प्रवाहित होते व नंतर स्थिर होते.

यातील चौथ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की हे वैभवशाली इंद्रदेवा, हविष्यान्न समर्पित करणाऱ्या याजकांना दुष्ट-दुराचारी व्यक्ती, शक्ती,विचार व स्पंदनांशी संघर्ष करण्यासाठी शक्ती व प्रचोदना प्रदान करा. ज्याप्रमाणे आपणास पराशक्तीने वृत्रासुराचा वध करण्यासाठी प्रेरणा व बल प्रदान केले होते. हे अश्वपती! आपल्या प्रेरणेने ज्ञानीजन, देवगण पातक व असुरांपासून मुक्त व्हावेत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे परमात्मा! भक्ती समर्पण करणाऱ्या साधकांना दुष्ट व अपवित्र स्पंदन व अदृश्य शक्तीशी युद्ध करण्यासाठी प्रेरणा व शक्ती प्रदान करा. ज्याप्रमाणे आदिशक्तीने तुला विश्वनिर्मितीची स्फूर्ती प्रदान केली होती तसेच तुम्हां उभयंतांच्या प्रेरणेने दुष्ट स्पंदने नष्ट होवोत.

# इंद्राग्निस्तुती

हे वैशिष्ट्यपूर्ण साममंत्र आहेत कारण या साम मंत्राची देवता इंद्राग्नि आहे. या साम मंत्रामध्ये इंद्र व अग्नीला एकतत्वारूपाने पाहिले आहे, त्यामध्ये एकरूपता दर्शवली आहे. हे साम मंत्र सामवेदाच्या उत्तराचिक भागातील प्रथम अध्यायाच्या द्वितीय खंडामध्ये आढळतात. या साम मंत्रांचा ऋषी विश्वमित्र गायिन आहेत. हे साममंत्र एकूण तीन आहेत. या साम मंत्रांचा छंद गायत्री आहे. ज्या साम मंत्राचा छंद गायत्री असतो, त्या साम मंत्राचे गायन अत्यंत सुलभ रीतीने करता येते. या साम मंत्रांचे चक्र अग्नीचक्र असावे. या साम मंत्राची रागिनी भैरवी व राग रुद्र आहे. या साम मंत्रांच्या चरणांमध्ये यमक नाही.

हे सूक्त अल्पाक्षरी आहे.

**इंद्राग्नि आ गतं सुतं गीर्भिनभो वरेण्यम् |**

**अस्य पातं धियेषिता ||**

**इंद्राग्नि जरितु: सचा यज्ञो जिगाति चेतन: |**

**अया पातमिमं सुतम् ||**

**इंद्रमग्निम् कविच्छदा यज्ञस्य जूत्या वृणे |**

**ता सोमस्येह तृप्तताम् ||**

यातील प्रथम साममंत्राचा असा अर्थ आहे की, हे इंद्रदेवा! हे अग्निदेवा! अर्थातच इंद्राग्निदेवा! आमच्या स्तुतींनी प्रभावित झालेला, आकाशापेक्षा उंच अर्थात गगनचुंबी मुंजवान शिखरावरुन व पर्वतावरुन मौजवती वनस्पती पासून प्रकट झालेला मौजवान सोमरस सर्वश्रेष्ठ आहे. हा सोमरस आम्ही तुम्हांला समर्पित करत आहे. आपण आमची इच्छा पूर्ण करावी व आमच्या भक्तीभावाला स्वीकारुन ह्या सोमाचे पान करावे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे परमात्मा व हे परमप्रकृती! अर्थात हे परात्पर परब्रम्हा! आमच्या भक्ती व समर्पण युक्त, गायत्रीमातेच्या व ब्रम्हदेवाच्या मस्तकातून उत्पन्न झालेला हा

ज्ञानयुक्त कर्मयोग, जो आम्ही आचरण करण्याचा प्रयास केलेला आहे. परमात्माचा जणू मानसपुत्र असणारा कर्मयोग, ज्ञानयोग व ध्यानयोगाप्रमाणेच सर्व योगांमध्ये सर्वश्रेष्ठ आहे. आपण ह्या कर्मयोगाचा स्वीकार करुन ह्याचे उत्तम फलित आम्हाला प्रदान करावे.

यातील द्वितीय साममंत्राचा असा अर्थ आहे की हे इंद्रदेवा! हे अग्निदेवा! आपण स्तुती, यज्ञ, पूर्णाहुती व दानधर्म करणाऱ्या याजक व भक्तांचे साहाय्यक व्हावे. स्तुती व आहुतीकारणे ज्याक्षणी आपल्या उभयंताचे आगमन होईल, त्याक्षणी आपण स्फूर्तिदाता व यज्ञाचे मुख्य साधन असणाऱ्या सोमरसाचे पान करावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे परमात्मा व परमप्रकृती! आपण प्रत्येक साधक, भक्त, याजक, होत्री, पुरोहित, अर्ध्वयू, योगी, सिध्दांचे साहाय्यक ठरावे. भक्ती, स्तुती, कर्मकांड, कर्मयोग, ध्यान, तपस्या, यज्ञ व ज्ञानयोगाकारणे ज्याक्षणी आपले आगमन परमानंदारुपाने आमच्या शुध्द आत्म्यामध्ये होईल, त्याक्षणी

आपण उभयंतांनी आपल्या मानसपुत्रास म्हणजे आमच्या कर्मयोगास, सत्कर्मांस ग्रहण करावे, स्वीकृत करावे.

यातील तिसऱ्या साममंत्राचा असा अर्थ आहे की यज्ञाच्या प्रेरणेने, साधना, पुण्यकर्म, भक्ती, ज्ञान व ध्यानाच्या प्रेरणेने स्तुती, यज्ञ, साधना, पुण्यकर्म करणाऱ्या याजक, साधकांसाठी योग्य फलदाता इंद्र व अग्नि आहेत. आम्ही त्यांचीच पूजा करतो आहोत. ह्या उभयंता देवता या यज्ञामध्ये सोमरसपानाने संतुष्ट होवोत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, कर्मकांड, साधना, यातुविद्या, पुण्यकर्म, ज्ञान, ध्यान करण्याच्या प्रेरणेने कर्मकांड, साधना आदि करणाऱ्या साधक व भक्तांसाठी योग्य फलदाता परमात्मा व परमप्रकृतीच आहेत.आम्ही त्यांचीच साधना करतो आहोत. ह्या उभयंतांनी या जीवनामध्ये, या विश्वामध्ये, या ब्रम्हांडामध्ये आगमित होऊन आम्ही अर्पण केलेले सर्वस्व ग्रहण करुन आमचे कल्याण करावे.

हे अत्यंत सुंदर व महान आशयाचे साममंत्र आहेत आणि हे साममंत्र विशेषही आहेत. कारण अन्य साममंत्रांमध्ये अग्निला इंद्राचे साहाय्यक म्हटले गेले आहे, तर या साममंत्रात उभयंता देवतांना एकरुप एकच मानले आहे.

## *परिशिष्ट*

१) गृण्हित :- ग्रहण करण्यायोग्य

२) गेयन :- गायन

३) गेयता :- लय

४) अर्ध्वयू :- यज्ञाचा श्रेष्ठ व ज्येष्ठ पुरोहित.

५) होतार :- होत्राचा पुरोहित.

६) होत्री :- होत्र करणारा यजमान.

७) दावानल :- वनातील अग्नि.

८) वडवानल :- समुद्रातील ज्वालामुखी.

९) बृहत्साम :- महान साममंत्र

१०) ऋत्विज :- यज्ञ, कर्मकांड,ध्यान आणि तप करणारे ऋषि.

११) नयकारी :- नेण्यायोग्य.

१२) विहित :- निश्चित केलेले.

१३) रश्मी :- किरणे

१४) पृथक :-भिन्न

१५) प्रदत्त :- दिलेले

१६) हवि :- आहुती

१७) हविष्य :- आहुती अथवा समर्पण

१८) याजक :- यजमान

१९) ब्रम्हरंध्र :- टाळू

२०) शोधन :- प्राप्त करणे

२१) महदाशयदायक :- महान ज्ञान देणारा

२२) प्रचुर :- प्रचंड

२३) यजुर्गेयता :- यजुषांतील लय.

२४) प्रणीत :- निर्मित, स्फुरित.

२५) प्रचोदना :- प्रेरणा, प्रेरीत करणे.

२६) पायस :- दुग्धजन्य पदार्थ.

# संदर्भ ग्रंथांची सूची


१) हिंदू तत्त्वज्ञान

२) ऋग्वेद

३) यजुर्वेद

४) सामवेद

५) ब्राह्मणपुराण

६) ऐतरेय ब्राह्मण उपनिषद

७) छांदोग्य उपनिषद

८) बृहदारण्यकोपनिषद

९) महाभारत

१०) द्रौपदी

११) भगवद्गीता

१२) देवी पुराण

१३) देवी महात्म्य

१४) अग्नि पुराण

१५) शांकर भाष्य

१६) सामवेद संहिता (हिंदी) -भगवती देवी शर्मा

१७) विकीपीडिया

१८) संस्कृत भाषा वेदविषयक प्रवेशिका क्र. ३(हिंदी)

*हे पुस्तक कसे वाटले, हे*


*shaktileelanikita@gmail. com*


*या माझ्या इमेल आयडीवर रिप्लाय देऊन कळवा.*


**निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके**


पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा









# निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके













## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.
## निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे तेरावं पुस्तक.

निकिता राजेश पाटील ही विद्यार्थिनी मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे,

यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी, दिपूजा चव्हाण असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?